# प्रेस नोट दि.१४/०२/२०२४
## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची धडक कारवाई
## पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीत गांजाची विक्रीकरीता धुळे येथुन तस्करी करणा-या एका इसमास ताब्यात घेवुन त्याचेकडुन ०४ लाख रुपये किंमतीचा ८ किलो गांजा जप्त

**मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांनी आय.टी.पार्क मध्ये काम करणारे तरुण/तरुणी, उद्योगनगरीमध्ये झपाटयाने होणा-या विकास कामांमध्ये काम करणारा कामगार वर्ग, शिक्षण घेणारे तरुण/तरुणी यांचेवर कामाचे/शिक्षणाचे बोजामुळे व्यसनाकडे वळुन अंमली पदार्थाचे विळख्यामध्ये पडु नयेत करीता जनजागृती करणे व कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत केले आहे.**

**त्याप्रमाणे मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, संदीप डोईफोडे सो व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री विवेक मुगळीकर सो यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वैभव शिंगारे यांनी** सहा पोलीस निरीक्षक समीर वाघ, पोलीस उप निरीक्षक ज्ञानेश्वर दळवी, राजन महाडीक यांची पथके तयार करुन त्यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत केले.

दि.१२/०२/२०२४ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील **पोलीस अंमलदार प्रसाद जंगीलवाड व मयुर वाडकर** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळली की, पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीतील एक इसम रात्रीचे सुमारास शिरपुर धुळे येथुन वल्लभनगर एस.टी. स्टॅड येथे गांजा हा अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता येणार आहे. त्यांनी सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे यांना कळविली असता त्यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील सहा पोलीस निरीक्षक समीर वाघ, पोलीस उप निरीक्षक ज्ञानेश्वर दळवी, पोलीस अंमलदार संतोष दिघे, मनोज राठोड, मयुर वाडकर, प्रसाद कलाटे विजय दौंडकर व प्रसाद जंगीलवाड यांचे एका पथकाला कारवाई करणेबाबत मार्गदर्शन व सुचना देवुन रवाना केले. बातमीप्रमाणे वल्लभनगर एस.टी. स्टॅण्डचे बाहेर सापळा लावुन **इसम नामे बायला अनसिंग किराडे वय ४० वर्षे रा. बोबंलेपाडा ता. शिरपुर जि. धुळे** यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन **एकुण ४,२९,४५०/- रू. किं.चा ०८ किलो ५६९ ग्रॅम गांजा व मोबाईल** असा माल जप्त केला. त्याचेकडे विचारपुस केली असता त्याचेकडे मिळुन आलेला गांजा हा त्याने **इसम नामे पठाण डोंगरसिंग बामणे रा. बोबंलेपाडा ता. शिरपुर जि. धुळे** याचेकडुन आणला असल्याचे सांगितले. त्या दोघांचेविरुध्द **पिंपरी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ११७/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब), २९** प्रमाणे गुन्हा दाखल केला. गुन्हयाचा पुढील तपास पिंपरी पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगीरी ही **मा.पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, संदीप डोईफोडे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. विवेक मुगळीकर,** यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वैभव शिंगारे, सहा.पोलीस निरीक्षक समीर वाघ, पोउपनि श्री. ज्ञानेश्वर दळवी व पोलीस अंमलदार प्रसाद जंगीलवाड, मयुर वाडकर, संतोष दिघे, मनोज राठोड, विजय दौंडकर, प्रसाद कलाटे, यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड

# <u>प्रेस नोट दि.१४/०२/२०२४</u>
# <u>अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची धडक कारवाई</u>
# <u>पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीत रात्रीचेवेळी गांजा विक्री करणा-या ०४ महिलांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन ०१ लाख रुपये किंमतीचा गांजा जप्त</u>

**मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांनी आय.टी.पार्क मध्ये काम करणारे तरुण/तरुणी, उद्योगनगरीमध्ये झपाटयाने होणा-या विकास कामांमध्ये काम करणारा कामगार वर्ग, शिक्षण घेणारे तरुण/तरुणी यांचेवर कामाचे/शिक्षणाचे बोजामुळे व्यसनाकडे वळुन अंमली पदार्थाचे विळख्यामध्ये पडु नयेत करीता जनजागृती करणे व कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत केले आहे.**

**त्याप्रमाणे मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, संदीप डोईफोडे सो व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री विवेक मुगळीकर सो यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वैभव शिंगारे यांनी** सहा पोलीस निरीक्षक समीर वाघ, पोलीस उप निरीक्षक ज्ञानेश्वर दळवी, राजन महाडीक यांची पथके तयार करुन त्यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत केले.

दि. १३/०२/२०२४ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील **पोलीस अंमलदार प्रदिप शेलार व मितेश यादव** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळली की, वाकड पोलीस स्टेशन हद्दीतील म्हातोबानगर झोपडपट्टी येथे काही महिला रात्रीचेवेळी काम करणारे कामगारांना गांजाची विक्री करीत आहेत. त्यांनी सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे यांना कळविली असता त्यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील सहा पोलीस निरीक्षक समीर वाघ, पोलीस उप निरीक्षक पोलीस अंमलदार प्रदिप शेलार, प्रसाद जंगीलवाड, मितेश यादव, अशोक गारगोट व पांडुरंग फुंदे तसेच सायबर सेल कडील महिला सहा पोलीस निरीक्षक सिमा मुंढे, महिला पोलीस अंमलदार जयश्री माळी, मोनिका चित्तेवार यांचे एका पथकाला कारवाई करणेबाबत मार्गदर्शन व सुचना देवुन रवाना केले. बातमीप्रमाणे म्हातोबानगर झोपडपट्टी येथे जावुन सापळा लावुन महिला नामे **१) मोनिका राजेंद्र वाडघरे, वय २७ वर्षे ,रा वाकड रोड, कृष्णा स्विट होम समोर, म्हातोबा नगर, वाकड पुणे २) हर्षदा कृष्णा राऊत वय २३ वर्षे रा. वाकड रोड, कृष्णा स्विट होम समोर, म्हातोबा नगर, वाकड पुणे ३) गिता मुकेश यादव वय ३५ वर्षे रा. वाकड रोड, कृष्णा स्विट होम समोर, म्हातोबा नगर, वाकड पुणे ४) माला अनिल गुंजाळ वय ३८ वर्षे रा. वाकड रोड, कृष्णा स्विट होम समोर, म्हातोबा नगर, वाकड पुणे** यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन **एकुण १,०१,५००/-रु. किंमतीचा माल त्यामध्ये एकुण ०१ किलो ४३० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ माल व दोन मोबाईल** असा जप्त केला. त्यांनी त्यांचेकडे मिळुन आलेला गांजा हा **महिला नामे गिता मलकेकर रा. भाटनगर पिंपरी पुणे व रेखा तामचीकर रा. भाटनगर पिंपरी पुणे** यांचेकडुन आणला असल्याचे सांगितले. त्यांचेविरुध्द **वाकड पोलीस स्टेशन गु.र.क्र. ११७/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(अ), २९** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदरची कामगीरी ही **मा.पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, संदीप डोईफोडे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. विवेक मुगळीकर,** यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वैभव शिंगारे, सहा.पोलीस निरीक्षक समीर वाघ, पोउपनि श्री. राजन महाडीक व पोलीस अंमलदार प्रदिप शेलार, प्रसाद जंगीलवाड, मितेश यादव, अशोक गारगोट व पांडुरंग फुंदे तसेच सायबर सेल कडील महिला सहा पोलीस निरीक्षक सिमा मुंढे, महिला पोलीस अंमलदार जयश्री माळी, मोनिका चित्तेवार यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड